२५११
६३७७

# मे घ मा ला

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बालवाङ्मय
दा. क्र. ६३७७

म. रं. शिरवाडकर

IRBK-0106372

कॉण्टिनेण्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणें २

# मेघमाला

म. रं. शिरवाडकर

अनुक्रम 30820
वर्ग वा-वा
क्रमांक 2800
नों. दि. 8-7-5

IRBK-0106372

कॉण्टिनेण्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणें २

प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी
कॉंटिनेंटल प्रकाशन
१९६।१९ टिळकरोड, पुणें २

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन
प्रथमावृत्ति : ऑक्टोबर १९५७
किंमत : दोन रुपये

मुद्रक : य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
१९६।४६ सदाशिव, पुणें २

ती. बाईच्या स्मृतीस—

* * * *

*महाराष्ट्रांतील सुविख्यात कवि आणि टीकाकार श्री. वामन नारायण देशपांडे यांनीं या कविता-संग्रहाला प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्यांचा अतिशय ऋणी आहें. तसेच हा संग्रह आपलेपणाने प्रसिद्ध केला याबद्दल कॉंटिनेंटल प्रकाशनचे संचालक श्री. अनंतराव कुलकर्णी यांचाहि मी आभारी आहें.*

*'अज्ञात वीर' या पहिल्या कवितेंत सहाव्या ओळींत, "त्याने" ऐवजी "त्यातु" असें वाचावें. बाकीचे मुद्रणदोष किरकोळ असल्याने त्यांचा येथे उल्लेख केला नाही.*

**म. रं. शिरवाडकर**

अनुक्रम 30429
वा. वा.
क्रमांक 2499
नों. दि. 5-7-51

# प्रस्तावना

'मेघमाला' हा श्रीयुत म. रं. शिरवाडकर यांचा पहिलाच काव्य-संग्रह असून त्यांत त्यांच्या बत्तीस कविता संकलित करण्यांत आल्या आहेत. बहुतेक कविता नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत. शिरवाडकर सुविद्य असून 'सेल्स टॅक्स'मध्ये अधिकाराच्या जागेवर आहेत. अशा रूक्ष व किच्चकट व्यवसायांत राहूनहि ते काव्यरचना करतात, यावरून त्यांनी रसिकतेची किती जोपासना केली असेल, याची कल्पना येईल. किंबहुना कवित्व त्यांच्या रक्तांत आहे, असेंहि म्हणतां येईल. कारण सध्याचे सर्वश्रेष्ठ कवि कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांचे ते बंधु आहेत.

'मेघमालें'तील कविता नवकाव्यापैकी नव्हेत, हें आरंभींच सांगून टाकलें पाहिजे. हें सांगण्यांत त्या कवितांचें वैगुण्य दाखविण्याचा हेतु नाही. नवकाव्य नसणारें तें काव्यच नव्हे, असें मानणारा साहित्यिकांचा एक वर्ग आपल्याकडे आहे. परंतु नवकाव्याबाहेरहि उच्च प्रतीचें काव्य असूं शकतें, हें या वर्गास वेळोवेळीं सांगावयास पाहिजे! कुसुमाग्रज, आ. रा. देशपांडे, बा. भ. बोरकर—हीं तीन कवि-नामें निर्दिष्ट केलीं, तरी या विधानास पुष्टि मिळेल. नवकाव्यांतील चांगल्या अंशाचें खरा रसिक स्वागतच करील. पण त्याचबरोबर नवकाव्याबाहेरच्या सत्काव्याची कदर करण्यासहि तो चुकणार नाही. 'मेघमालें'तील कविता अशाच नव-

काव्याबाहेरच्या आहेत. त्यांना ‘ पारंपरिक ’ हा निंदाव्यंजकता दर्शविणारा शब्द न लावतां ‘ विदग्ध ’ हा शब्द लावावा असें मी म्हणेन.

‘ मेघमालें ’तील कवितांचा आशय व अभिव्यक्ति हीं दोन्ही विदग्ध स्वरूपाचीं आहेत. प्रणय, निसर्गप्रेम, दलितांविषयी सहानुभूति—यांसारखे विषय त्यांत हाताळले आहेत. भाषा व छंद यांवर शिरवाडकरांचें चांगलेंच प्रभुत्व आहे. त्यांची भाषा प्रौढ पण सफाईदार आहे. ते मात्रावृत्तें किंवा जाति मोठ्या प्रमाणांत व अक्षरछंद कमी प्रमाणांत वापरतात. त्यांच्या अकरा कवितांत गणवृत्तांचा उपयोग केलेला आहे. त्यांची ‘ मधुकरा ! निघालें घरीं ’ ही एकच कविता घेतली, तरी त्यांची गणवृत्तांतील कविता किती प्रसन्न असते, याची साक्ष पटेल. गज्जल हा वृत्तप्रकार व सुनीतें हा रचनाप्रकार यांचाहि ते वापर करतात.

‘ मेघमालें ’तील सुमारें एक तृतीयांश कविता प्रणयपर आहेत, असें स्थूलमानाने म्हणतां येईल. त्यांत बरीच विविधता आढळते: ‘ गुजगोष्ट ’-मधील प्रेयसी ‘ मी तुजवरती रे प्रेम मनोमय करतें ! ’—असा कबुली-जबाब देते. ‘ तो दिन आठवे का ? ’ यांतील प्रेमिक आपल्या ‘ राणी ’ला विवाहपूर्व पहिल्या ‘ मूक भेटी ’ची आठवण देतो. ‘ स्मृतीपरी त्या ’ काव्याचा नायक परक्याच्या झालेल्या प्रेयसीच्या स्मरणाने तळमळतो, तर तशीच गत ‘ हो विलंब आता ’ मध्ये एका ‘ परदारे ’ची होते ! ‘ सागराचें प्रणयगीत ’ या गज्जलांतील ‘ जीवना अन् पूर्तता दे माझिया तूं आणुनी ’—या अंतिम चरणांत प्रेमावांचून जीवनास पूर्णता येत नाही, म्हणजेच जीवनाच्या सर्वांगीण विकासास प्रेम आवश्यक असतें, हें तत्त्व ग्रथित केलें आहे. शिरवाडकरांची निसर्गाची आवड ‘ दृष्टिपथीं ये, ’ ‘ हिमालय ’, ‘ वादळ ’ इत्यादि कवितांत व्यक्त झाली आहे. ‘ दृष्टिपथीं ये ’ ही कविता वेधक आहे. ‘ भोतीं उंचच उंच ’ व ‘ अंधःकार भरे ’ या दोन सुनीतांत शिरवाडकरांचा दीन-दुबळ्यांविषयींचा जिव्हाळा प्रगट झाला आहे.

' अभागी ' व ' रहिवासी कुठला हा ? ' कवितांत एखाद्या कथासूत्राचा विरल धागा अनुस्यूत असलेला भासतो. ' जादुगार ' मधील

माझ्याहून थोर कोणी
नसे, ठसे मनीं भाव
नाही कोणी लहान वा
माझ्याहून येथे जीव !

ही द्वैत सरल्यानंतरची अद्‌भुत अनुभूति उल्लेखनीय असून तिचीच एक प्रकारची परिणति ' सर्वेश्वर मी ' कवितेंत झाली आहे, असें म्हणावयास हरकत नाही. ना. वा. टिळक यांची ' पुरे जाणतों मीच माझें बल ' ही कविता ज्या व्यापक अर्थाने घ्यावयाची आहे, त्याच व्यापक अर्थाने ' सर्वेश्वर मी ' कविताहि घ्यावयाची आहे. ' वादळ ' कवितेंत आलेल्या घोर नैराश्य-भावनेला ' निर्धार ' मधील आशावादाने परस्पर छेद गेला आहे, तेव्हा शिरवाडकर हे विफलतावादी आहेत की काय, असा संशय घेण्याचेंहि कारण नाही ! मला विशेष आवडलेल्या कवितांत ' मरुभूवर ', ' निशिगंधाचा सरला रुसवा ', ' ये क्षणभर येथे ' वगैरे कवितांकडे अंगुलि-निर्देश करतां येईल. वाचकांस रुचिपरत्वें आणखीहि कांही कविता आवडतील.

शिरवाडकरांचा फुटकळ सुंदर कल्पनांवर भर नसला, तथापि ते क्वचित् तशी कल्पना लिहूनहि जातात. उदाहरणार्थ, निर्धार ' मधील

गळे पीस एकेक तें कांचनाचें
दिशांच्या पिसाऱ्यांतुनी उज्ज्वल

ही मनोज्ञ कल्पना पहा. प्रकाशाचें पीस झडण्याची कल्पना ' रहिवासी कुठला हा ? ' कवितेंतहि येऊन गेली आहे. ' जीवन–लहरीं'त ' वर्षांच्या वृक्षा'ची कल्पना आली आहे. ' मोतीं उंचच उंच ' सुनीतांत विद्युद्दीपांना मधुमक्षिकांची उपमा दिली आहे, ती फक्त लटकण्याच्या क्रियेपुरतीच ग्राह्य मानावयाची आहे. तेथे रंगसादृश्य अभिप्रेत नाही.

'मेघमालें'तील कवितांवर कुसुमाग्रजांच्या कवितांची कांही ठिकाणीं छाप पडलेली दिसते. एकच नमुना दाखवितों : 'विशाखा' संग्रहांतील 'ऋण' कवितेच्या आरंभींच्या दोन चरणांचा विस्तार म्हणजे शिरवाडकरांची 'मृगा' कविता होय. बाकी एकाच घराण्यांतील दोन कवींपैकी धाकट्या भावाने थोरल्या भावाचें कमी–अधिक प्रमाणांत अनुकरण केल्यास त्यांत वावगें तर कांही नाहीच, पण कौतुकाचा भागच जास्त आहे, असा माझ्यासारख्याचा कौल होईल ! या संग्रहांत क्वचित् छंदोभंग–यतिभंग आणि 'तममय', 'स्थीर' अशीं किरकोळ अशुद्धें आढळतात, हें जातां जातां नमूद करावयास हवें.

प्रस्तावना म्हणजे समीक्षण नव्हे. खेरीज, या चिमुकल्या संग्रहाबाबत अधिक विस्ताराचें प्रयोजनहि नाही. शेवटीं एकच मुद्दा मांडून आटोपतें घेतोंः विदग्ध स्वरूपाची कविता ठराविक ठशाची न वाटावी, यासाठी तींत विकार–विचारांची सखोलता तर हवीच, पण थोडीबहुत प्रयोग-शीलता देखील हवी. या सर्वांच्या जोडीला उज्ज्वल कल्पकतेची भर पडल्यास मग ती रचना अभिजात रसिकांच्या आदरास पात्र झाल्यावांचून खासच राहत नाही. शिरवाडकरांच्या या पहिल्याच काव्यसंग्रहांत हे सर्व गुण अपेक्षित नव्हते. तथापि त्यांचे यापुढील काव्यसंग्रह अशा धर्तीचे निघण्याची आशा–नव्हे, खात्री–या संग्रहावरून वाटत आहे, एवढें स्नेह-भावाने त्यांच्या निदर्शनास आणून त्यांची रजा घेतों.

खामगांव ( वऱ्हाड )
ता. ५–१०–१९५७

**वामन नारायण देशपांडे**

# अ नु क्र म णि का


१ अज्ञात वीर १
२ दृष्टिपथीं ये ३
३ अभागी ५
४ मेघमाला ७
५ हिमालय ९
६ जीवन-लहरी १२
७ मरुभूवर १६
८ मधुकरा ! निघालें घरीं ! १८
९ सागराचें प्रणयगीत २०
१० स्मृती परी त्या— २२
११ अन्धार २४
१२ गुजगोष्ट २५
१३ तो दिन आठवे का ? २६
१४ भोतीं उंचच उंच— २७
१५ आलीस कां तूं तरी ? २८
१६ अंधःकार भरे २९
१७ सर्वेश्वर मी ३०
१८ जादूगार ३२
१९ निशिगंधाचा सरला रुसवा ३४
२० पुकार, पुकार ३६
२१ मी श्रमार्त ३८
२२ निळ्या महालीं ३९
२३ विटलेल्या जीवनांत ४०
२४ रहिवासी कुठला हा ? ४२
२५ ये क्षणभर येथे ४५
२६ मृगा ४७
२७ मनोगत ४८
२८ हो विलंब आता ५०
२९ वादळ ५२
३० विकल मनासम ५४
३१ रे कर्णा ५६
३२ निर्धार ५८

. १ .

# अज्ञात वीर

वीर येथे झोपलेला ! मंद टाका पाउलें !
ज्ञात कोणा ना जरी वा स्मारकांचीं ना दळें

थोरवी याची कळाली केधवाही ना कुणा
भग्न देहीं याचिया ना अश्रु कोणी सिंचिले

झुंजतां हा कीर्तिचे ना चौघडे ते वाजले
काळ त्याने ग्रासितां ना न्यून कोणा भासलें

रम्य भावी जीवनाच्या आग चित्रा लावुनी
आप्तसौख्या साधण्याते प्राण त्याचे झुंजले

दैव त्याच्या जीवनीं घाली निखाऱ्यांचा सडा
ना परी आगींतही तें तेज त्याचें आटलें ॰

प्राक्तनाशीं शूरतेने झुंजुनी रात्रंदिनीं
संकटांचे शैल सारे मस्तकीं अन् झेलिले

दिव्य स्वप्नें, गोड आशा, भव्य आकांक्षा तशा
होम सर्वांचा करूनी दूर सौख्या लोटिलें

शांतवी भू मेघ जैसा जीवनाते सांडुनी
क्रूर कर्तव्यांत होते प्राण त्याचे गुंतले

ऐन तारुण्यांत छाया मृत्युची घेरी तया
लागते कोठे फुलूं तों पुष्प हें कोमेजलें !

जीवनाची रम्यता ना देखिली त्याने कधी
जन्म मृत्यु येइ रानीं पेटल्या दावानलें !

रे प्रवासी थांब थोडा ! वीर येथे झोपला !
ज्ञात कोणा ना जरी वा स्मारकांचीं ना दळें !

. २ .

## दृष्टिपथीं ये

लपवित मागे खेडें ओस
दृष्टिपथीं ये पडकी वेस
तळीं शिलांची ढाळी रास
चिरांमधूनी असंख्य टाकी दुःखाचे श्वास !

भकास मंदिर अन् शेजारी
ढासळलेला कळस भूवरी
अथांग खाली डोह विषारी
विशाल अथवा विळखा घालुन नाग पडे दारीं

जवळ वडाचा भयद दरारा
पाचोळ्याचा तळीं पसारा
विहगांना ना येथे थारा
उदासलेल्या पर्णांमधुनी किरकिरतो वारा

दडल्या वाटा तृणसंभारीं !
ठेवुनि उघडीं दारें सारीं

शांतवी भू मेघ जैसा जीवनाते सांडुनी
क्रूर कर्तव्यांत होते प्राण त्याचे गुंतले

ऐन तारुण्यांत छाया मृत्युची घेरी तया
लागते कोठे फुलूं तों पुष्प हें कोमेजलें !

जीवनाची रम्यता ना देखिली त्याने कधी
जन्म मृत्यु येइ रानीं पेटल्या दावानलें !

रे प्रवासी थांब थोडा ! वीर येथे झोपला !
ज्ञात कोणा ना जरी वा स्मारकांचीं ना दळें !

. २ .

## दृष्टिपथीं ये

लपवित मागे खेडें ओस
दृष्टिपथीं ये पडकी वेस
तळीं शिलांची ढाळी रास
चिरांमधूनी असंख्य टाकी दुःखाचे श्वास !

भकास मंदिर अन् शेजारी
ढासळलेला कळस भूवरी
अथांग खाली डोह विषारी
विशाल अथवा विळखा घालुन नाग पडे दारीं

जवळ वडाचा भयद दरारा
पाचोळ्याचा तळीं पसारा
विहगांना ना येथे थारा
उदासलेल्या पर्णांमधुनी किरकिरतो वारा

दडल्या वाटा तृणसंभारीं !
ठेवुनि उघडीं दारें सारीं

व्यथित उभीं हीं घरें बिचारीं
येईल कुणी आस असे वा अजुनी काय उरीं !

विहीर एकच मध्यावरती
पाण्याला तर येई भरती
त्यावर पानें पडतीं, कुजतीं
चहुबाजूंनी रमणींचा ना वेढा यापुढती !

दूर सारुनी झुडुपें दाट
निघे येथुनी पाउलवाट
चढे शिवाचा डोंगर राठ
घोर कहाणी सांगाया वा जाई वर दूत !

. ३ .

## अभागी

जगा श्रांत अंकावरी घेउनीया
निशा जागते एकटी मंगला
बसे सोबतीला नदीच्या तटाकीं
प्रवासी कुणी दूर प्रांतांतला

शिरीं साचली धूळ देहावरीही
असे वस्त्र अंगीं जुनें फाटकें
सभोंती फिरे शून्य दृष्टी भरारा
कधी नेत्र झाकून दे हुंदके

दिसे चित्र डोळ्यापुढे तें भयाण
स्मृती जीव त्याचा करी व्याकुळ
नदीच्या प्रवाहीं दिसे रक्त त्यातें
शिरे घोर कानांत कोलाहल !

स्मरे गेह कांता तशी प्रेममूर्ती
सुधास्यंदिनी निस्तुला संपदा

सशासारखा गोड, निष्पाप, भोळा
घरीं नाचला बाळ भोंती सदा

मुखांतून त्याच्या कुणी ऐकला ना
कधी शब्द गेला कुणा वाकडा
विराजे सदा स्नेह नेत्रांत त्याच्या
झरे त्यांतुनी चांदण्याचा सडा

दिनीं एक कल्लोळ झाला सभोंती
नभाचें भरे अग्निने अंगण
यमाचे जणू दूत मोकाट झाले
करायास रक्तामधे नर्तन !

उफाळे मदोन्मत्त तांडा खलांचा
गराडा तयाच्या घराला पडे
वनीं पेटल्या घोर दावानलीं हें
खगाचें सुखी नीड वा सापडें !

कडाडे क्षणीं बंदुकींतून गोळी
जिवाची सखी कोसळे खालती
मुका जीव निष्पाप अन् बालकाचा
हसूनी बुटांखालती सोलती !

अभागी भ्रमिष्टापरी हिंडतो हा
कुणाचा करी शोध रात्रंदिन ?
सरे यापुढे जीवनाची उभारी
युगासारखा एक होई क्षण !

. ४ .

# मेघमाला

मेघमाला अंबरीं ही दाह सारा लोपवी
अंतरीं माझ्या फुलाया लागली आशा नवी

मेघमाले ! मंगले ! ये बाहतें मी मेदिनी
पूर्वभेटींच्या स्मृती त्या अंतरीं मी साठवीं

स्वप्न तैसें मीलनाचें मोहरें माझ्या मनीं
क्रूर ह्या आगींतही तें चित्र मातें रंजवी

ग्रिष्म हा थैमान घाली, पाहुनी त्या तांडवा
कोपलेला जीवनाचा नाथ माझा हा रवी

कष्टवी मातें कहाली सारखी रात्रंदिन
मी तृषार्ता—अन्य कोणी कां तृषा ही भागवी ?

क्रूर ज्वाला भोंवताली जाळिती देहास या
दे फुलं संत्रस्त माझा जीव वर्षावैभवीं

भेटतां प्रेमें मला तूं शांत होई भास्कर
हर्षदायी तें तुझें ना लास्य कोणा मोहवी ?

सौरभाचें दान दे ये मृत्तिकेला तापल्या
माझिया गेहीं उफाळो सौरभाची जान्हवी

जीवनाचें गीत येतां गा सखी संजीवक
ये त्वरेने दे घुमूं ती गीतवृष्टी लाघवी

झाकलेले कृष्ण वस्त्रीं तूं जलाचे शैल ते
शुभ्र पाणी दुःखहारी त्यांतुनी फेसाळवी

शीत धारांच्या करांची गाढ प्रेमाची मिठी
ना कशाची आस, वांछा–भेट आतां ती हवी !

. ५ .

# हिमालय

हा उभा हिमालय शैलश्रेष्ठ झुंजार
जणुं घेइ शिरावर आकाशाचा भार
  मस्तकीं विराजे मुकुट हिमाचा रम्य
कंठांत गुंफिती सिंधू–गंगा हार !

देहावर हर्षित ढग फिरती स्वच्छंद
थयथयाट करिती वारे अवखळ, धुंद
  कडकडते रुसुनी वीज रुपेरी केंव्हा
–हें कौतुक सारें पाहीं हा सानंद !

घेऊन जलाची दौलत गर्वें मेघ
गगनांतुन जाती वेगें, लागे रीघ
  परि रौद्र देखतां शैलवराचें रूप
निखळून जलाचा पडला खाली ओघ !

शोषीत जलाचा थेंब थेंब तो क्रूर
जाळीत ग्रिष्म ये जगता बेदरकार

तो परी आगही विनम्र येथे होई
ना खंडित करिते–उफाळवी जलधार !

वसुधेते वरुनी नभ उपहासी मत्त
स्फुंदतसे अवला जीव बुडे शोकांत
गगनाचा कोणी गर्व हराया येथे
हा उभा महर्षी ! होई वसुधा शांत !

की केव्हा पर्वत आकाशातें भिडती
क्रोधाने गर्जे नभ, पर्वत हादरती !
मावळत्या रविपरि बुडती सगळे खाली
हा एकच मानी ! मस्तक अजुनी वरती !

जग निर्मुनि, तेथिल सांगाया वृत्तान्त
प्रभु जाई अपुला ठेवुनि वा हा दूत
उंचावुन मस्तक प्रेषित परमेशाचा
जग सगळें घेई दृष्टीच्या कक्षेंत !

वा महान शंकर त्याचा क्रोध महान
ती अमरपुरीही वाटे त्यातें हीन
सुरश्रेष्ठासाठी शतकें खपुनी ब्रह्म ।
हें विराट उभवी काय निवासस्थान !

का नील नभांतिल बघण्या मत्त विलास
उत्कंठित झाली वसुधा लागे ध्यास
साकार होउनी उत्कंठा ती येथे
डोकावुनि बघते भिडवुनि नेत्र नभास !

विश्वाचा अथवा मांडुनिया संसार
जगदीश्वर उधळी रत्नें दिव्य अपार
  हिमशुभ्र तारका शशाङ्क देई गगना
हा अमोल अर्पी धरणीस अलंकार !

. ६ .

## जीवन-लहरी

सदनीं माझ्या तिमिरीं
ठेवा पाउल आपुलें
उडवा अन् त्याच क्षणीं
देहाचीं या शकलें !
   रातकिड्यापरि जगलों
   श्रमल्याविन मी दमलों
तममय जीवन पावो
तेजोमय अंत तरी !

( २ )

हर्षाने मी हसतां
स्मरण तुझें ना केलें
सम्राटा ! म्हणुनी कां
फिरविशि तूं मुख अपुलें ?
   मानवनीती परि ही
   अनुसरशी प्रभु तूंही !

थोरपणाची तुझिया
साक्ष कुठे मग मिळणें ?

( ३ )

स्वप्नांची रास सखी
घेउनिया हातीं तूं
येशि कशाला दारीं
काय तरी तव हेतू ?
    मधु स्वप्नांचा तर मी
    होउन राही स्वामी !
कळल्यावर हें आता
फिरशिल ना माघारी ?

( ४ )

दुबळ्यांवर निशिदिनिं कां
आग अशी पाखडतां ?
गर्वोद्धत त्यावर जा
कोसळुं द्या निर्दयता !
    मातीने काजळली
    मत्त करीं चुरगळली
हीं सुमनें प्रीतीने
खुलवा, फुलवा, जगवा !

( ५ )

घेऊनिया ध्यास तुझा
तुजला मीं आळविलें

वाट तुझ्या येण्याची
होते पाहत डोळे
   तूं हा मार्गावरती
   नौबति तव दुमदुमती
वाटे कां मज आता–
येउं नये येथे तूं !

( ६ )

हरिणीसम बागडते
नवकलिका ही फुलतां
शांत हिचे नेत्र, परी
चरणीं ही चंचलता
   यौवन प्रांतांत यदा
   जाइल होउनि प्रमदा
मंदावुन चरणगति
भिरभिरतिल हे डोळे !

( ७ )

कृष्ण ढगांचें जाळें
व्यापी नभ हें सारें
वर्षेचा वृक्ष जणूं
मोहरला फलभारें
   प्राशन करण्यास सुधा
   आतुरली ही वसुधा
गेले क्षण–ढग गेले
स्वप्न सरे एकाकी !

( ८ )

वठला हा वृक्ष अता
वैभव पडलें गळुनी
वेली ना भंवताली
आशा गेल्या जळुनी
    छायेसाठी पथिका
    घुटमळशी येथे कां ?
शल्य मनाचें जागें
करिशी कां, फिर मागे !

. ७ .

## मरुभूवर

( १ )

मरुभूमीवरती उतरे नंदन आज
अन् माळावरती विलसे सुंदर ताज
हें हृदयहि माझें हर्षित होउनि आता
आशेचा चढवी रम्य रुपेरी साज !

( २ )

जीवनांत माझ्या सदैव जर अंधार
मी अंधारांतच थाटिन या संसार
स्वप्नांची नगरी निर्मुनि नयनांपुढती
हा तुडवित जाइन दाहक मी अंगार !

( ३ )

सौंदर्यवती मज नको शीतला रात्र
हृदयातें येई जाळित माझ्या मात्र
मज रखरखलेला रुक्ष बरा दिन वाटे
हीं हृदयामधलीं शल्यें दडतीं आंत !

( ४ )

येतांच रात ती आग फुलाया लागे
निद्रिस्त भाव ते होत अचानक जागे
प्रश्नांची सेना करिते व्याकुळ मजला
चाललों कसा मी ! कुठे ! कशाच्या मागे !

( ५ )

चांदणें जलावर रसरसलें जरतारी
कोलाहल विरला सरलेली रहदारी
ही वेल तटाकीं-मोजित वा ही तारा
बसलेली येथे कोणी रम्य किशोरी !

( ६ )

रचुनी आशांचा येथे सगळ्या ढीग
निजहस्ताने मीं तया लाविली आग
आदळतां ज्वाला माझ्या देहावरती
कां आता म्हणुनी कोणावरती राग !

( ७ )

ही चाहुल माझी लागे-करिती वाडे
निमिषांत आपुलीं सारीं बंद कवाडें !
तव ओटीवर मज रातभरी राहूं दे
रेटीन पहाटे माझें पुढती गाडें !

. ८ .

## मधुकरा ! निघालें घरीं !

मृणाल पहिला सख्या स्मरुनि स्नेह तूं आपुला
गमे खचित येउनी सुखविशील तूं रे मला
ठरे सकल स्वप्न तें ! सुखद ना तुझें दर्शन !
अखेर तुज पाहिल्याविन सरायचें जीवन !

कळे बघुन ना मला सुख तुझ्या अता लोचनीं
तुझी न चिर संगती फिरुन वांछिली मीं मनीं
कधीच मधु आस ती त्यजुन जातसे अंतर
कळे न मज हेंहि कां सुलभ ना मला भास्कर ?

बघून यमदूत हे निकट वाटलें रे मला
सखा मज दिसेल कां क्षणच येउनी एकला
असेन चुकल्यें मनीं फुलविण्यांत ही कामना
कशास लपवूं—कळे मज परी वळें कांहि ना !

मनांत पण रोष ना—तुजवरी न तो संभवे
अपार मम भक्ति ही निज न रोष रे साहवे

असार मम जीवनीं फुलविलेस कांहीं क्षण
तुझें न फिटणार हें मजकडून मोठें ऋण !

उदार पवना ! यदा मम जळून हो मृत्तिका
खचीत करशील तूं मजवरी कृपा एक का ?
सखा वसतसे घरापुढति त्या मला अंगणीं
जपून गणुनी सुता मज तुझीच ने वाहुनी

श्रमून फुलवीन मी नित तिथे फुलें गोजिरीं
गणेन मज धन्य मी बघुनि ती सख्याच्या करीं
कधी निज शिरावरी मिरवुनी तयाचे पद
पुन्हा मधुर स्पर्श तो अनुभवीन मी सौख्यद

असेल जर जोडिलें शुभद पुण्य मीं जीवनीं
प्रभू ! मम सखा असो सकल त्या धनाचा धनी !
सुरम्य सहवास तो स्मरुनिया तुझा अंतरीं
निरोप तव घेत मी ! मधुकरा, निघालें घरीं !

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
नों. दि.

. ९ .

## सागराचें प्रणयगीत

दूर तूं कां चांदराणी ये गडे ये धावुनी
जीवना अन् पूर्तता दे माझिया तूं आणुनी

एक होती जीव सारे प्रेमभावाने जगीं
जीवितासी कंठणें ये भग्न माझ्या प्राक्तनीं

देव माझें गीत गाती—अप्सराही अंबरीं
वैभवाचा सोस त्या ना ध्यास तूझा मन्मनीं !

निष्ठुरे ! कां गीत कानीं ना रिघे माझें तुझ्या
जीवघेणी काय क्रीडा लाभते ही खेळुनी !

तारकांना लाजवी त्या मौक्तिकांचा मी पहा
हार आहे अर्पिण्यातें ठेविलेला गुंफुनी !

मेघशय्याही नभाची हीन भासे ज्यापुढे
शूभ्र फेनाची इथे ही शोभते शय्या सुनी !

तुंग लाटा-दास तूझे शैलसे येथे खडे
सौरभाचे कुंभ वायू येथ देई सांडुनी !

ना तुझ्या मार्गांत येथे ती ढगांची मालिका
दर्प अन् विद्युल्लतेचा येथ जाई भंगुनी !

वैभवांची सर्व राणी तूं सखे हो एकली
जीवना अन् पूर्तता दे माझिया तूं आणुनी !

. १० .

## स्मृती परी त्या—

श्रमले, विरले दीप सभोंती
        विसावलेले रस्ते निर्जन
करांत असशिल बद्ध कुणाच्या
        करीत त्याचें सुखमय जीवन

उपहासी मज क्षणक्षण येथे
        कशांत माझा जीव रमेना
नयन झाकतां निद्रेसाठी
        होई दाहक मात्र बिछाना !

संक्रांतीच्या मंगल दिवशीं
        इंद्रधनूसम करुनी भूषा
येशि अचानक सदनीं माझ्या
        पांगुळली मम दुबळी भाषा !

कणकण येथिल उदास उजळे
        दिव्य प्रभेने रमणी तुझिया

उजाड अथवा माळावरती
चंद्रकरांची बहरे माया

तीळ देउनी माझ्या हातीं
स्वरांत लाडिक म्हणशी मजला
" गोड बोलणें राहूं द्या पण—
दोन शब्द ते निदान बोला ! "

येतां जीवनिं तूं मम हृदयीं
निद्रित नटले भाव मनोहर
रजनी येतां फुलतें जैसें
असंख्य तारांनीं तें अंबर !

ये दिन फिरुनी संक्रांतीचा
—तुझें न होणें राजस दर्शन
असेल कोणी उन्मन झाले
अधरसुधा तव करुनी प्राशन !

यौवनशाली स्वप्न सरे तें
तापद आता येई जाग
स्मृती परी त्या निर्दय अजुनी
माझा येती काढित माग !

# अन्धार

निज तेजाने जो उजळी तममय प्रांत
तो निखळे तारा—भीषणभर हो रात
ही रात्र भयावह प्रकाश सारा आटे
दुर्दैव करी वा अपुल्यावरती मात !

हे अनंतकालापासुनि या अंधारीं
चालले प्रवासी कंटकमय कांतारी
जी अखंड जागुनि दावी वाट तयांना
ती हाय निमाली उज्ज्वल ज्योत रुपेरी !

काजळतां आता अमोल कांचनधार
अंधार दाटला ! चहूंकडे अन्धार !
जागे ही आशा उमजे ना पण तिजही
होणार कशी ही नौका दरियापार !

. १२ .

## गुजगोष्ट

कुजबुजशी, हसशी–मधुर तुझा सहवास
दरवळे प्रीतिचा त्यांत परी न सुवास !
मी स्तब्ध बैसतें निकट तुझ्या अन् बघतें
नेत्रांत मनोहर भाव तुझ्या फुलतिल का ?
अन् हृदयीं तुझिया रिघतिल का मम हाका !

कुंजांत फुलांची फुलली सुंदर दुनिया
हे शीतल वारे करिती पुलकित काया
तरुशाखेवरती वनराणी मी बसलें
–अपुरेच परी रे गमतें चित्र मनास
येणार कधीं तूं जडला एकच ध्यास !

तूं दूर ठेउनी सारे विषय जरा ते
गुजगोष्ट ऐक ही आता तुज मी कथितें
सांगूं का तुज मी–सांग गडे–सांगूं का !
सांगतां कसें मम अंतर परि धडधडतें
–मी तुजवरती रे प्रेम मनोमय करतें !

## . १३ .

# तो दिन आठवे का ?

गेहावरूनि रमणी तव जाइ जों मी
दारीं उभी–स्मित फुलें तव रोमरोमीं
कांती प्रसन्न नयनीं जणुं रम्य राका
राणी ! तुला सुखद तो दिन आठवे का ?
माझ्यावरी नयन अन् तव होत स्थीर
मी थांबलों क्षणभरी तुझिया समोर
नेत्रीं सुरम्य खुलल्या प्रणयी पताका
राणी ! तुला सुखद तो दिन आठवे का ?
गेलों पुढे–परत खेचति प्रेमधागे
मीं पाहिलें तुज वळून हळूच मागे
तूं भावपूर्ण नयने दिधल्यास हाका
राणी ! तुला सुखद तो दिन आठवे का ?
साकार आज अपुलें मधु स्वप्न होतां
न्हातां सुखांत प्रणयांकित जीव आता
ती मूक भेट पहिली तुजला स्मरे का ?
राणी ! तुला सुखद तो दिन आठवे का ?

# भोंतीं उंचच उंच—

भोंतीं उंचच उंच हे पसरले प्रासाद गर्वोन्नत
वृक्षातें मधुमाक्षिका लगटती रानामधे ज्यापरी
विद्युत्-दीप असंख्यसे बिलगले मागे, पुढे अन् वरी
तेजाचे जणु दूत हे उधळती चोहींकडे दौलत !

सोनेरी सुरईंत मत्त मदिरा घेऊन, शय्येवरी
पुष्पांच्या, पडले कुबेर इथले धुंदीमधे जागत
देती यौवनधुंद आणि ललना शय्येवरी सोबत
संपत्ती करण्यास रात्र खपते दासीपरी साजरी !

ज्यांनी अन् श्रमुनी इथे उभविली ही मूर्त कारागिरी
अंधारांत, धुळींत भग्न अपुलें ते कंठती जीवन
येणें जीवन-माधुरी, सफलता वांट्यास ती कोठुन
जेथे भ्रांत मिळायची पडतसे साधीसुधी भाकरी !

येथे धुंद विलास—त्यास्तव घडे रात्रीं सदा जागरण
त्यांना जागरण मात्र तें घडतसे भूकेमुळे भीषण !

. १५ .

# आलीस कां तूं तरी?

हातां हिंडत मी विषण्ण हृदयीं माळावरी एकला
होते खिन्न उदास वृक्ष सगळे निःशब्द तैसे खग
तेजाने रवि आपुल्या सकलही व्यापीत होता. जग
होता मानसिं माझिया घन परी अंधार तो दाटला !

तों तूं हास्यमुखी अचानक इथे येशी जशी चंद्रिका
मेघांच्या समुहांत कृष्ण प्रगटे तेजाळ विद्युल्लता
अंधारीं घनदाट एक चमके वा ज्योत तेजोन्विता
मातें आणि विचारशी हसुनी तूं " स्वारी अशी खिन्न कां ?

शेजारी असतां इथे तव सखी कां म्लानता ही गडे " !
चुंबूनी मजला हळूच पुसशी शोकाश्रु मल्लोचनीं
अंकीं मस्तक घेउनी रिझविलें गाणीं मला गाउनी
निद्रेचा कर ना कधी मज कळे डोळ्यांवरी तो पडे !

अन् जो हर्षभरें उठून बघतों—गेलीस तों तूं दुरी !
जाशी हाय दुणावुनी तम परी—आलीस कां तूं तरी ?

. १६ .

# अंधःकार भरे

अंधःकार भरे निशीथसमयीं माझ्या सभोंती मनीं
गाती रातकिडे लपूनि तिमिरीं रात्रीस ते आरती
भूकेली मम बालके दिनभरी आक्रंदुनी घोरती !
कां दैवा भरडून जीव इवले विक्राळ घेशी रणीं !

उन्मत्ता हिमलाटही फिरतसे गेहांत चोहीकडे
देहा आवरुनी सखी पडतसे थंडींत कापे परी
बाहूंची मम ऊब ही कूठवरी रोधील वायूसरी ?
मातीचा टिकणार बांध दुबळा कां सागराच्यापुढे !

खोटें हास्य दिनीं मुखावर परी रात्रीं तुझीं आसवें
गालीं ओघळती–विषाद जणूं वा येई कपोलांवरी
रत्नांची बघुनी दशा प्रिय तुझ्या व्याकूळशी अंतरीं
निष्पापी असतील जीव मजला शापीत श्वासासवें !

प्रातःकाल गिळील रात्र, सविता टाकील भू व्यापुनी
माझी जीवनरात भीषणतरा होई परंतू दिनीं !

# सर्वेश्वर मी

सर्वेश्वर मी ! सर्वेश्वर मी !

चराचरांचा मी सांगाती
सजीवतेची मी चित्‌शक्तिं
देतों जीवन, जीवनमुक्ती
विश्व कणासम माझ्या धामीं !
सर्वेश्वर मी ! सर्वेश्वर मी !

वांछी मी ये सृष्टी उदया
आदेशें मम जाई विलया
केवळ माझी सारी किमया
सदैव राही पण निष्कामी !
सर्वेश्वर मी ! सर्वेश्वर मी !

ना मज बांधी केव्हा जाल
सुखदुःखाचें हें त्रिकाळ
भूमीवरची पिसाट धूळ

शैलशिरा कां शिवते व्योमीं ?
सर्वेश्वर मी ! सर्वेश्वर मी !

क्रोध भयावह, क्रौर्य अनावर
क्रोधान्वित पण माझें अंतर
वात्सल्याने भरे निरंतर
सेवक ना मज, पण मी स्वामी !
सर्वेश्वर मी ! सर्वेश्वर मी !

मोहरलेली माझी माया
संभ्रम पाडी विश्वातें या
त्यजुनी सुखकर खोटी छाया
पाहिल कोणी का केवळ ' मी ' ?
सर्वेश्वर मी ! सर्वेश्वर मी !

. १८ .

## जादूगार

तुझ्या प्रभू पाउलांचें
होतां मज हें दर्शन
सरे खेद खंत सारी
मोहरलें हें जीवन !

वास तूझा सदनांत
दिलासा रे माझ्या मना
वांट्यास न येणें आता
कसलीही विवंचना !

चंद्राहून सौम्य तुझा
प्रकाश हा चेतोहर
क्षीण त्याच प्रकाशांत
दुपारचा दिवाकर !

नेत्र तूझे माझ्यावर
स्थिरावती हे जोवर

नाही शंका नाही भीती
  आगळा तूं जादूगार

मांगल्याचा मनामधे
  दाटलासे आतां पूर
सरे आतां द्वैत सारें
  सरे आतां हुरहूर !

माझ्याहून थोर कोणी
  नसे, ठसे मनीं भाव
नाहीं कोणी लहान वा
  माझ्याहून येथे जीव !

म. ग्रं. सं. ठाणे वाचनालय शाखा.
क्र. ६३७७ ता. दि.
वि.

. १९ .

## निशिगंधाचा सरला रुसवा

निशिगंधाचा सरला रुसवा
श्वास तयाचे वातावरणीं
दाटति, होई सौरभशाली
मोहमयी ही मधुरा रजनी

तुझ्याच वाटेवरती माझे
स्थिरावलेले डोळे, अंतर
ज्यांतिल आता भावहि सारे
मीलित होती नयनीं आतुर !

तिमिरांकित ही होई धरणी
तिमिर मनांतिल पण ओसरला
आगमनाची तुझिया घटका
—कणकण माझा खुलला, फुलला

कुजबुज विरली गीत नदीचें
संथ, सुधामय रिघतें कानीं
ये वाऱ्याची अस्फुट ऐकूं
दंडेली ती पानोपानीं

क्षणक्षण आता होइ युगासम
वेळ असा कां आज कळेना
कळे न तुज का विरहव्यथेने
होय कशी ही माझी दैना !

दीप दूरचे क्षण मिणमिणती
क्षणांत लपती अन् अंधारीं
आशांशी हा माझ्या तसला
खेळ नको रे हृदयविदारी !

. २० .

# पुकार, पुकार

पुकार, पुकार असाच विजय
निळ्या ह्या नभांत भ्रमत निर्भय

खन्त ना कशाची भय ना कशाचें
ठाऊक एक तें कौतुक जिवाचें !

जगशी स्वैर तें जीवन समृद्ध
कोणतें सुख ना तुजला निषिद्ध

रंग तो काळाच स्वरही कर्कश
शोभे ना मस्तकीं तुऱ्याची आरास

पिसारा मोराचा आला ना वांट्याला
काव्यांत उल्लेख कधी न लाभला

नसो रे नसलें रूप तें रेखीव
नसो रे नसलें वाणींत लाघव

वृत्तींत उन्माद वाहतो भरून
सौंदर्यें बेगडीं पळती भिऊन

चिमण्या, कोकिळा घारी अन् गिधाडें
देखतां तुला रे पळती बापुडे !

सामर्थ्य-वैभव एक तें महान
सौंदर्ये सारीं तीं गमती लहान !

. २१ .

## मी श्रमार्त

मी श्रमार्त होउनि आलों तुझिया दारीं
तूं कुबेर मी तर असला दीन भिकारी !
कापऱ्या स्वराने दिली तुला मीं हाक
वाटलें समोरी येशिल तूं रे रागें
मी चार पाउलें वळलों अवचित मागें !

परि होतें वदनीं हास्य तुझ्या फुललेलें
स्नेहाचीं होतीं नेत्रीं फुललीं कमलें
घेउनी करीं कर देशी आसन मजला
अन् विनम्र होउनि माझ्यापुढति उभा तूं
हें अपूर्व स्वागत, स्नेह अपार, परंतू —!

घाबरा, गाढ तव स्नेह करी मम जीव
ह्या सौजन्याचा साहुं कसा वर्षाव ?
ना क्रूर उपेक्षेविन मज ओळख कसली
या उजाड माळावरती टाक तुषार
संतोष तयातें त्यांतच ! आवर पूर !

अनुक्रम ३०५२८
विभाग प्रा.वा.
क्रमांक २५९९
नों. दि. ५-४-६१

. २२ .

## निळ्या महालीं

निळ्या महालीं हर्षभरें मीं केली आरास
तुझाच लागे रमणा, मजला एकच नित ध्यास
गुलाब फुलती उधळित भोंती सुगंध सुखकारी
मार्गी अवखळ वारे तुजला आणाया दारीं

पदक्षेपणीं प्राजक्ताचें स्वागत दाराशीं
न्हाऊं घालिल येतां तुजला ओतुनि सुमराशी
निळ्या महालीं निळ्या खगांची निनादती गाणीं
गोड लकेरी पाय टाकितां रिघतिल तव कानीं

अमल सुगंधी निळ्या जलाने धुतलें अंगण मी
आनंदें की पुलकित व्हावा हृदयाचा स्वामी
निळ्याच वसनीं मीही नटलें, निळी वरी शाल
ओवाळाया निरांजनें मम नयनांची नील

विफल गमे आरास परंतू तुझ्याविना सारी
राजस हंसा, विहार करण्या ये या कासारीं

. २३ .

## विटलेल्या जीवनांत

विटलेल्या जीवनांत
रंग भरा, रंग भरा
सारुनिया शेवाळें तें
वाहूं द्या हा मुक्त झरा

कुजलेलीं सडलेलीं
जलाशयावर पानें
बघूं देती जलातें ना
नवी माती, नवीं रानें

पवना, ये सार दूर
तापद हें आवरण
पर्जन्या ये त्वरें द्याया
जलौघाचें नवें दान

घुमेल ते गीत पुन्हा
जीवनाचें रानोरानीं
आनंदाचें, उन्मादाचें
नवें पर्व नव्या मनीं

. २४ .

## रहिवासी कुठला हा ?

दशदिशा ओततात
  अंधाराचें जगीं धन
घाटावर बसे कोण
  एकटाचि दीन, म्लान

प्रकाशाचें झडतसे
  एक एक दिव्य पीस
गजबजलेला घाट
  पडतसे आता ओस

रहिवासी कुठला हा ?
  खिन्न घाली मान खाली
अश्रू आर्त डोळ्यांतून
  ठिबकती शांत जलीं

अश्रु भव्य जलौघांत
  विरले ते त्याच क्षणा।

जीवनाच्या ओघांत या
   तुझें दुःख काय कोणा !

रहिवासी कुठला हा ?
   नसे घर, गणगोत ?
प्रकाश न प्राक्तनांत
   तममय सदा रात !

स्थीरावले चित्रापरी
   शिरावर दोन्ही कर
निराशेची, खिन्नतेची
   उफाळते आग वर !

शून्य दृष्टि एकाएकी
   न्याहाळिते चारी दिशा
अंधारांत शोधतसे
   प्रकाशाची काय रेषा

जल घेई ओंजळींत
   ओती आणि शिरावरी
हिमलाट नाचे भोंती
   आगींत हा जळे परी

मध्यरात्र घुमे, दाट
   अंधाराचे घाली सडे
वृक्ष भव्य भोंवतीचे
   भासतात काळे कडे

काजळलें नभ वरी
   काजळलें खाली जल
विश्व व्यापी आरपार
   अंधाराचें कृष्ण दल

रहिवासी कुठला हा ?
   बसे येथे अजूनीही
डोळे मिटुनिया मग्न
   जीवनाचें चित्र पाही ?

जीवनाच्या आकांक्षांचा
   डोळ्यांपुढे दिसे खच
दिनरात निराशेचा
   त्याच्यावरी चाले नाच

श्रांत देह टाकी अंतीं
   वैतागुनी भूमीवर
रहिवासी कुठला हा
   जीवनाचा वाही भार ?

. २५ .

## ये क्षणभर येथे

मातींत, शिलांवर अग्नीचे कण फुलती
धगधगले वारे घोंगावत तुज भोंती
        ही आर्त उसासे टाकी धरणी प्रबला
जाणार असा तूं कूठवर आता पुढती !

ये जरा बाजुला फुलली माझी बाग
जाणवे न जेथे भयद रवीचा राग
        चहुबाजूंनी अन् सुरम्य ह्याच स्थळाचा
हे अधीर वारे काढित येती माग

गर्वोद्धत किरणें अग्निमय बलशाली
आदळती माझ्या बागेवर मखमाली
        आदळती पण विरती त्याच क्षणास
जणु आग उफाळुन जलांत शिरली, विरली !

रे नको संभ्रमीं पडूं—नसे आभास
वाहतें तुला ये मधुर फुलांची रास
        ही बागेमधली बघतां नव आरास
निवतील तुझे श्रम फुलेल अन् उल्हास !

हिमशुभ्र जलाचा चहूंकडे संचार
स्वर्गीय सुधेची वळली येथे धार
        हें रम्य वसाया आसन मृदुल तृणाचें
तूं तहानलेला ! येइ जलातें पूर !

मृदु पर्णांची ही भूमीवरती शय्या
घनदाट तरूंची झुलती खाली छाया
        मधु गंध फुलांचे दाटति वातावरणीं
ये क्षणभर येथे टेक श्रांत तव काया !

. २६ .

## मृगा

उगीच शिणवूं नको तव जिवा मृगा पाडसा
कशास तरि धावसी अदय वाळवंटीं असा
रवी धगधगे वरी धगधगेल अन् कोपुनी
नको उगिच धावुं रे ! जल मिळे न वाळूरणीं !

उरीं फुटत धावतां स्रवत नीर नेत्रांतुनी
जलाविण कुठे न त्या जल मिळे पुढे शोधुनी !
विराट क्षितिजावरी तुज दिसे परी सागर
कळेल तुज का कधी भुलवितो तुला भास्कर !

कलेल रवि श्रांत हा कनकसागरीं पश्चिमीं
खुलेल वसुधा सुखें सुखदशीत चंद्रागमीं
फुलेल मधु चांदणें फुलवुनी दुजें नंदन
चराचर खुलेल अन् सरुनि घोर आक्रंदन

जलार्थ मग फीर तूं चहुकडे मृगा कोमला
नको उगिच धावुं रे ! नाभिं कलिंद हा कोपला !

२७

## मनोगत

कैसा न कळे तुज पटवूं हृदयाचा गाढ भाव

दिसलास जरी तूं दूर
मी लाजेनें हो चूर
कोठून धीर बोलाया, कुठले वा हावभाव ?

मी बोलायाचें म्हणुनी
ठरवितें मनीं फिरफिरुनी
तूं दिसतां विरते वाचा, नेत्रांचा तव प्रभाव !

मी अबोल म्हणुनी अवघा
हा रोष, कळे मज अनघा !
परि प्रशान्त जल तें राही लागे ज्याचा न ठाव !

या हृदयीं दिवसारातीं
मी तुझीच पुजितें मूर्ती
जीवनपथ चालायाचा तुजसह ही एक हाव !

मम मानसनभ झाकळलें
त्या आड परी रेखियलें
अणुअणूमधे प्रीतीने मधुर तुझें मात्र नांव

प्रीतीचे तोडुनि धागे
कां रागें फिरशी मागे
मौनांत प्रेम फुललें रे–नेत्रातें नेत्र लाव !

हा कळे न उकलायाचा
पीळ कसा दोन मनांचा
मुखदुर्बळ, दुबळी, भोळी मी, असला तव स्वभाव !

. २८ .

## हो विलंब आता

मी दिनीं, दिनांतीं, रात्रीं तुजला पुजिलें
खुलविण्या तुला मी हसलें, रडलें, रुसलें
हो निष्फळ पूजा—भक्त वळे माघारीं
अन् अवचित आता दुसऱ्याची मी होतां
नेत्रांत थरारे तुझिया कां व्याकुलता ?

याचना, आर्जवें, राग तसा अनुराग
ना शकलें आणूं हृदयातें तव जाग
गेलें निघुनी मी हताश प्रेमनिराश
उन्माद प्रीतिचा येई कुठुनी आज !
हा मदन बने कां एकाकी शुकराज !

प्रणयाची मदिरा लोटिलीस तूं दूर
जीवनीं निराशा ओतुनि माझ्या क्रूर
गेले दिन वर्षे—शिकलें तुज विसराया
ही प्रवास करण्या फिरुनी सजतां नौका
तूं आर्त स्वराने देशी कां मज हाका !

हो विलंब आतां, फीर गडे माघारा
प्रणयिनी जिवाची होई रे परदारा !
        ये अंतर दाटुनि—मार्ग न अपुला एक
मोहरो फुलांची रास तुझ्या मार्गांत
तिमिरांकित जीवन उजळो रम्य प्रभात !

. २९ .

## वादळ

सुटलेलें येथे वादळ भीषण क्रूर
घर माझें राही दूरच आता दूर
मज वेडी आशा आणी ओढुन येथे
झालेलें हेंही बंद परी मज दार !

विसरुनी किशोरी, स्नेह आपुला गाढ
ना दिलास आश्रय मज तूं दाराआड
अन् सभोंवताली पिसाट वादळवारा
जणुं घरेस लागे भीषणतेची ओढ !

हा वृक्ष उभा परि येथे एक विशाल
पर्णांचा भासे हिरवा भव्य महाल
घेउनी खगांना भयार्त पोटीं, झुंजे
वीरासम करुनी निज देहाची ढाल !

पोटांत घेउनी झाडें अन् पाषाण
हा समीर धावे प्रबळ, मत्त, बेभान !
करि चुरा चुरा जें मार्गीं दिसते त्याचा
क्रौर्यास भयावह येई काय उधाण !

हें घोर कुणाचें चालतसें थैमान
धुंदींत धरा वा धुळींत करते स्नान
भयव्याकुळ सेनेपरि अन् सैरावैरा
पर्णांचीं शकलें धावति आश्रयहीन !

धोंगावें, गर्जे, खालीवरती लोळे
उन्माद जयांतुन वाटे मूर्त उफाळें
आव्हान आणि तें घेण्यातें बलशाली
नभ निनादवोनी मेघ निघाले काळे !

तोडुनी तटातट कोमल सारे धागे
रे मत्त समीरा ! उचल मलाही वेगें !
ने विश्वाच्या मज वाहुनिया परतीरा
जग तैसें जीवन तेथिल राहो मागे !

हें दुबळें माझें शोषुनि जीवन हीन
कर मित्रा मजला नूतन जीवन-दान
अभिमान तुझा उल्हास तसा उन्माद
दे फुलवूं माझे काजळलेले प्राण !

. ३० .

## विकल मनासम

विकल मनासम क्षीण शशी हा
नसल्यापरि हा व्योमीं असुनीं
चार ढगांचीं शकलें मोंती
—जाइ नभःश्री सारी रुसुनी !

व्यर्थ अचानक उडवी वारा
पाचोळ्याचा पीत पसारा
कळे न त्यातें, भग्न मनाला
सुखद स्पर्शही गमे निखारा !

अभिन्न झाल्या अंधारांत
दिशा मुलायम त्या बहुरंगी
भाव विविध वा हृदयामधले
विरती जणुं हे एका रंगीं !

झुरे. नदी ही–अल्प जलानें
कसे भरावें पात्र उभार ?
अपुऱ्या वसनें युवती कोणी
कसाबसा वा झाकी ऊर !

अस्फुट दुरुनी नगरामधला
कानावरती ये कोलाहल
विव्हल आशा जणुं हंबरती
गमती साऱ्या निरर्थ, निर्बल !

कुठें स्वप्न तें, कुठे जिगीषा,
अजिंक्य उज्ज्वल कुठे उभारी ?
प्रकाशकिरणांची कां येथिल
सरे अचानक ती रहदारी ?

## . ३१ .

# रे कर्णा

रे कर्णा ! आली अखेर घटका आली !

तव तेज रवीसम हिमालयापरि धीर
त्या सजल ढगासम असशी सदय उदार
विसरुनी जणू जल अग्नी अपुलें वैर
घडविती युगांचा मानव हा बलशाली !

सुरवर, आवाहन उदारतेला करुनी
नेतसे कुंडलें खुललीं जीं तव कानी
कुलगौरव नेई हिरावुनी तव जननी
भर सभेंत तुजला धिःकारी पांचाली !

अस्त्रज्ञ द्विजाची करिशी सेवा घोर
निद्रेस्तव त्याच्या तुजला जखमा क्रूर
शापाने पावे सेवा अंत अखेर !
गुरुकृपा विलक्षण लिहिली तुझिया भालीं !

परि दुर्दैवाची ना ही शोक–कहाणी
क्षण नमलास न तूं दैवापुढती मानी

राहिलास उन्नत, तेजोयुत, अभिमानी
सूर्यास कधी कां करिती म्लान मशाली !

निज प्राणांचा तुज लव ना उरला लोभ
ठाकतां रणीं तूं–प्रलया हो आरंभ !
उभविशी शवांचे जागोजागीं स्तंभ
जणुं प्रमत्त रगडी समीर पानें पिकलीं !

अन्याय मनीं जो आक्रंदे दिनरातीं
जी मानखंडना जागृत हृदयीं जळती
उपहासाचीं जीं शल्यें हृदया खुपती
तीं शस्त्रें होउनि ग्रासिति जग ह्या कालीं !

सांडले किती तें आजवरी समरांत
धरणीच्या देहावरती दुर्बळ रक्त
ना ढळली केंव्हा वसुंधरा ती शांत
ना जाणवली तिज रुधिराची ती लाली !

परि आज घालिशी न्हाऊं तिज रक्तांत
ती विरे विरक्ति, सरे समाधी शांत
थरथरुनी धरणी उठली अन् क्रोधांत
रथचक्र तुझें ती गिळून आता बसली !

कोसळला खाली धैर्याचा अवतार
मृत देहामधुनी ज्योत पडे बाहेर
डौलाने शिरली व्योमीं करित पुकार
दैवापुढती ही मानवजात न दुबळी !
रे कर्णा ! आली अखेर घटका आली !

## . ३२ .

# निर्धार

मदांधासवें झुंजतां पश्चिमेला
रणीं विद्ध झाला प्रतापी रवी
शिरे आंत अंधारसेना, जगातें
पदाशीं अता आपुल्या लोळवी

क्षणीं आवळूनी जगा कृष्णपाशीं
करूनी मुकीं घाबरीं पाखरें
करी चेतनाहीन सृष्टीसतीतें
भरे सर्व जीवां भयें कापरें !

गळे पीस एकेक तें कांचनाचें
दिशांच्या पिसाऱ्यांतुनी उज्ज्वल
प्रकाशांत न्हाले दिनीं ते दिनांतीं
सुखें पूजिती हें तमाचें दल

प्रमत्ता ! इथे सागराच्या किनारीं
जळे ज्योत माझी परी जागृत
जिवापाड झुंजून राहीन येथे
तुझें हीन स्वामित्व धिःकारित !

तमस्नात सिंधू धुमाळून लाटा
बघे मालवूं प्राणज्योतीस या
कधी ना परी होइ, होणार वा ना
उभारी मनाची कमी माझिया

तुझा सागरा, विश्वव्यापी दरारा
परी मी असें भानुचा वंशज
जरी विद्ध झाला कधी सिंह होई
गजाचें मदोन्मत्त कां सावज ?

तसा मत्त वायूहि देहावरी या
पिसाटापरी आदळे, कोसळे
परी संकटें देत सामर्थ्य जीवा
चढे धार ध्येयास त्यांच्यामुळे !

नभीं पूर्वद्वारांतुनी येत भानू
तमाचें करायास निर्दालन
प्रभावी पदक्षेपणीं त्या प्रभूच्या
जगा दिव्य लाभेल संजीवन

प्रभू ! तोवरी ज्योत राहील जागी
जरी जीव झाला कितीही श्रमी
तुझी देखतां अन् नभीं भव्य मूर्ती
सुखें श्रांत टाकीन हा प्राण मी

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
नोंदणी दि.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय शाखा.
वा. क्र. नों. दि ..............
वि. ... क्र. ..................

IRBK-0106372

IRBK-0106372